महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोंकण विभाग,
कोंकणभवन, खोली क्र.५०६, पाचवा मजला सी.बी.डी. बेलापूर, नवीमुंबई- ४०० ६१४
कार्यालय दूरध्वनी :- २७५८ ०३२१ ईमेल संदेश :- jd-konkan@mah.gov.in

क्र.सहसंलेवको/वि.चौ./सरळसेवा भरती/क.ले./कोकण विभाग/सूचना पत्रक/757 दिनांक :- 21 APR 2025

विषय: - कनिष्ठ लेखापाल भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने उमेदवारांना प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, कालावधी व परिक्षेच्या दिनांक संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ:- १.या कार्यालयाची जाहिरात क्रमांक ससंलेवको/सरळसेवा भरती/क.ले./को.वि./२०२४/ दि.३०.०१.२०२५
२.मा. संचालनालयाचे पत्र क्र.संलेको२०२५/प्रशा.कोषा/कार्या१/कले भरती प्रक्रिया/२४९, दि.१८.०३.२०२५.

सूचनापत्रक

सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोंकण विभाग, कोकण या विभागाची कनिष्ठ लेखापाल पदाकरीता रिक्त पदांची जाहिरात उक्त संदर्भिय जाहिरात दिनांक ३०.०१.२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरील परीक्षेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

- प्रश्नपत्रिकेतील १०० प्रश्नाचे विभाजन चार (A,B,C आणि D) कालबद्ध विभागात खालीलप्रमाणे येईल. प्रत्येक विभागात २५ प्रश्न असतील आणि ३० मिनिटे वेळ दिला जाईल.

अ.क्र.	विषयाचे नाव	कालबद्ध विभाग			
		Group A	Group B	Group C	Group D
१	मराठी	७	६	६	६
२	इंग्रजी	६	७	६	६
३	सामान्य ज्ञान	६	६	७	६
४	बौद्धिक चाचणी	६	६	६	७
प्रश्नांची संख्या		२५	२५	२५	२५
विभागानुसार वेळ		३० मिनिटे	३० मिनिटे	३० मिनिटे	३० मिनिटे

- मागिल विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण करेपर्यंत उमेदवारांना पुढील विभागात जाण्यास प्रतिबंध केला जाईल. या व्यतिरीक्त, उमेदवारांना विभागनिहाय दिलेला वेळ पूर्ण झाल्यानंतर प्रश्नांचे पुनरावलोकन करण्याची किंवा त्यांच्या प्रतिसादात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही. मागील विभागासाठी दिलेला वेळ पूर्ण झाल्यांनंतर पुढील विभागाचे प्रश्न आपोआप सुरू होतील.
- सहसंचालक, लेखा व कोषागारे, कोंकण विभाग, कोंकण या विभागाची कनिष्ठ लेखापाल पदाची ऑनलाईन परीक्षा दिनांक ०५.०५.२०२५ ते दिनांक ०७.०५.२०२५ या कालावधीमध्ये विविध शिफ्ट्स मध्ये घेण्यात येईल.

Vandana Joshi.

(वंदना जोशी)
सहसंचालक,
लेखा व कोषागारे कोकण विभाग,
कोंकणभवन नवी मुंबई.